# Visual MELODY

Volume 21
Quarterly Issue
1st March 2025

THE RAVI PARANJAPE STUDIO

E-Magazine About Visual Arts In free india
By - The Ravi Paranjape Studio


Featured Artist

## ARTIST PRABHASHANKAR KAWADI

Artist in Spotlight

Dr. Meera Kulkarni













© All paintings and illustrations used in this issue are duly acknowledged.




Visual Melody is a content-rich Free quarterly E- Magazine offered by The Ravi Paranjape Studio, dedicated to great Indian artists of the past and present generations.

*This FREE e-magazine is published quarterly in Marathi and English.*

*Visual Melody **FREE** subscription link:*
*https://www.raviparanjape.org/emagazine*

***The Ravi Paranjape Studio***

*'The Ravi Paranjape Studio' is a privately operated group, The group's objective is to promote the 'Design Based Culture' envisioned by Artist Ravi paranjape, through several initiatives run at the studio's art gallery and exhibition space located in Model Colony, Pune.*

***Credits***

*Editor: Rahul Deshpande*
*Art Direction: Sunil Gokarn*
*Design : Vinayak Chhatre*
*Project Coordinator: Varsha Pendse*

*1 Rutika, 1098/5-A, Model Colony,*
*Shivaji Nagar, Pune - 411016*

*+91 942 356 2530*
*www.raviparanjape.org*
*abhijatkala@gmail.com*

*All published information and images in this e-magazine are duly acknowledged and copyright protected by the respective parties.*
*This e-magazine is free to share as is. No part of this e-magazine shall be reproduced or shared in parts or used in any other way than intended.*



**Visual**
MELODY

**In This Edition**

In the first edition of 2025 of Visual Melody, we introduce you to one of the most prolific illustrators of the golden era of illustrative art in India, artist Shri Prabhashankar Kawadi.

Given the variety and quantity of work he produced over a fifty-year career, it would be hard to find anyone in India who hasn't come across artist Kawadi's expressive illustrations. His vast legacy continues to inspire and entertain through illustrations that span comic books, children's literature, magazine articles, textbooks, newspapers, book covers, advertisements, and several fictional series.

---

**या अंकात**

व्हिजुअल मेलडी च्या २०२५ च्या पहिल्या अंकात आपण भारतात बोधचित्रांचा सुवर्णकाळ गाजवणाऱ्या कलाकारांपैकी एक नामवंत कलाकार श्री. प्रभाशंकर कवडी यांचा परिचय करून घेणार आहोत.

श्री. कवडी यांच्या पन्नास वर्षांच्या कारकिर्दीचा आणि विपूल चित्रनिर्मितीचा विचार करता, त्यांच्या विलक्षण बोलक्या चित्रांच्या संपर्कात न आलेला माणूस भारतात विरळाच असेल. चित्रकथा, बाल साहित्य, मासिकं, पाठ्यपुस्तकं, वर्तमानपत्र, पुस्तकांची मुखपृष्ठ, जाहिराती, अनेक कथा, आणि साहित्यकृती ई. साठी त्यांनी करून ठेवलेला चित्रांचा ठेवा आजही तितकाच प्रेरणादायी आणि आनंददायी आहे.





# चित्रकार
# श्री प्रभाशंकर कवडी

भारतीय बोधचित्रकारितेच्या क्षेत्रातील एक महत्त्वाचे बोधचित्रकार म्हणून प्रभाशंकर कवडी यांचे योगदान उल्लेखनीय आहे. आपल्या बोधचित्रांमधून त्यांनी अस्सल भारतीयत्व जपत प्रभावीपणे दृश्य संवाद साधला. दीर्घकालीन गुणवत्तापूर्ण सातत्य हा त्यांचा आणखी एक महत्त्वाचा गुणविशेष जाणवतो.

28 सप्टेंबर 1924 साली जन्मलेल्या प्रभाशंकर कवडी यांनी शालेय शिक्षणानंतर चित्रकलेच्या उच्च शिक्षणासाठी सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्समध्ये जी. डी. आर्ट कमर्शियल साठी प्रवेश घेतला व 1947 साली डिप्लोमा प्रथम वर्गात दुसऱ्या क्रमांकाने पूर्ण केला. या शिक्षण काळातच त्यांनी स्केचिंग, मेमरी ड्रॉईंग, कॉम्पोझिशन, फिगर ड्रॉइंग अशा विषयात विशेष प्राविण्य मिळवले होते. साहजिकच त्यांचा ओढा प्रथमपासूनच बोधचित्र कलेकडे राहिला. 1952 सालापर्यंत ते जे. जे.मध्ये फेलो आणि नंतर अधिव्याख्याता म्हणून काम करत होते. अध्यापनाच्या या अनुभवानंतर ते जे. वॉल्टर थॉमसन या विख्यात जाहिरात संस्थेत बोध चित्रकार म्हणून सात आठ वर्ष कार्यरत होते. पुढे त्यांनी प्रतिष्ठित 'टाइम्स ऑफ इंडिया'मध्ये प्रवेश केला. येथील कामातून कथा चित्रकार म्हणून त्यांच्या कारकिर्दीला बहर आला. 'इलस्ट्रेटेड वीकली'मधून त्यांनी केलेली कथा चित्रे संपूर्ण भारतभर पोहोचली. आपल्या चित्रांमधून त्यांनी प्रभावी दृश्यसंवाद आणि समर्पक वातावरणनिर्मिती केली. त्यांच्या चित्रांमधील पात्रे, मनुष्याकृती अस्सल भारतीय वाटतात. त्यांचे हावभाव, पोशाख, सभोवतालचा पूरक तपशील रेखाटताना त्यांच्यातील नेमकेपणा जाणवतो. रेखांकनातून भावदर्शन करण्याच्या त्यांच्या वैशिष्ट्यांचा या बोधचित्रातून प्रत्यय येतो. तसेच त्यांच्या सूक्ष्मनिरीक्षण शक्तिचाही प्रत्यय या चित्रातून जाणवतो. 'टाइम्स ऑफ इंडिया'च्या अनेक प्रकाशनांतून त्यांनी दर्जेदार काम केले आहे. यात अनेक भारतीय भाषेतील अनुवादित साहित्य चित्रित करताना त्यांनी साहित्यिक मूल्य, शैली यांबरोबरच प्रांतिक वैशिष्ट्यांचा वापर आपल्या चित्रांमधून सादर केलेला दिसतो.


एप्रिल १९७५
लाउड-स्पीकर्स हटवा!
लाउडस्पीकर्स मुर्दाबाद!
आमच्या अभ्यासात विघ्न!
लाउडस्पीकर्स हटवा!


किशोर
दिवाळी अंक
नोव्हेंबर '७३


किशोर
दिवाळी अंक


किशोर
महाराष्ट्र दिन,७२
बाल वक्तृत्व स्पर्धा
मे १९७२


बोलके खांब
कथा व चित्रे: प्रभाशंकर कवडी
राजा, तुझ्या प्रश्नांची उत्तरे या खांबांना विचार.
हे खांबानो, माझा अंगठा काळा पडतो आहे, या पंतप्रधानांचे कपाळ काळे पडते आहे आणि माझा हा कारागीर बांधत असलेला हा राजवाडा दर महिन्याला जास्त जास्त आकुंचन पावत आहे. हे चमत्कार का होत आहेत हे आपण मला सांगाल काय?
राजा, या प्रश्नाची उत्तरे देण्यापूर्वी आम्ही तुला आमची ओळख करून देणे आवश्यक आहे.
आम्ही ज्या झाडापासून तोडून तयार केले गेलो आहोत त्या झाडांच्या मुळाशी एका थोर महात्म्याची समाधी आहे.
तो महात्मा एक अत्यंत प्रामाणिक, कर्तव्यदक्ष असा तुझ्या आजोबांच्या पदरी सरदार अधिकारी होता. त्या पुण्यात्म्याच्या सहवासाने आम्हाला आमचे विचार प्रगट करण्याचे सामर्थ्य मिळाले आहे.
त्या पुण्यात्म्याच्या परिसरातून दूर करून तू आम्हाला येथील पापी जनांच्या सहवासात आणले आहेस.
तुझ्या प्रश्नांची उत्तरे दिल्यानंतर तू कृपा करून आमची येथून सुटका कर.
पण तुम्ही पापी जनांच्या सहवासात आला आहात म्हणजे काय?




प्रभाशंकर कवडी हे एक शैलीदार कलावंत होते. त्यांची शैली रेखांकनप्रधान होती. रेखांकन, मानवी देहाचे चित्रण करताना त्यांनी रेषेचा वापर प्रभावीपणे केला आहे. काळी शाई आणि टाक / क्रोकवील यांच्या साहाय्याने केलेले रेखांकन अधिक तरल व भावस्पर्शी जाणवते. त्यांच्या चित्रात विविध जाडीच्या रेषा असत. बारीक रेषा, जाड रेषा, ब्रशने भरलेले आकार, रेषांच्या वापरातून केलेली पोतनिर्मिती यातून त्यांचे चित्र तयार होत असे. चित्रातील पार्श्वभूमीसाठी ते ज्या चित्रघटकांची निवड करत, त्यांचा वापर चित्ररचना आणि वातावरणनिर्मिती अशा दोन्हींसाठी केलेला जाणवतो. बोधचित्रांमध्ये यथार्थ दर्शनाचा वापर करताना आशय परिणामकारक पद्धतीने व्यक्त करण्याकडे त्यांचा कल दिसतो. त्यामुळे चित्राला वेगळी दृश्यपातळी मिळते. दृश्य भाषेतील या विविधतेतून शेवटी आशय समर्पकदृष्ट्या पोहोचवणे हे उद्दिष्ट त्यांनी साध्य केलेले दिसते. यातूनच त्यांची साहित्यविषयक जाण प्रगल्भ होती हे जाणवते.

श्री. कवडी यांनी प्रामुख्याने पेन अँड इंक, स्केपर बोर्ड अशा तंत्रांमध्ये काम केले असले, तरीही रेषेची विविधता पोतनिर्मिती चित्रातील काळया-पांढऱ्या जागांचा समतोल, चित्ररचनेतील विविधता यातून त्यांनी खूप विविधांगी शैलीदार चित्रनिर्मिती केली आहे. हे करताना त्यांनी तत्कालीन मुद्रणकलेच्या मर्यादांचा विचारही केलेला जाणवतो. चित्रनिर्मितीतील तांत्रिक विविधतेबरोबरच त्यांनी अनेक विषयांवर बोधचित्रनिर्मिती केली. यात पौराणिक, ऐतिहासिक विषय, साहस कथा, लहान मुलांच्या गोष्टी, कविता, लेख याबरोबरच कॉमिक्स, पाठ्यपुस्तक, वृत्तपत्र, पुस्तकांची कव्हर्स, नाटकांच्या जाहिराती, दिवाळी अंक, मासिकांमधील लेख, कथा-मालिका अशा अनेक प्रकारात विपुल दर्जेदार निर्मिती केली आहे. किशोर या लहान मुलांच्या मासिकासाठी त्यांनी केलेली बोधचित्रे यादृष्टीने अभ्यासनीय आहेत.



























आपल्या सुमारे 50 वर्षांच्या कलाकारकिर्दीत त्यांनी अनेक संस्था, प्रकाशने यांच्यासाठी दर्जेदार चित्रनिर्मिती केली आहे. त्यांच्या कला योगदानाने अनेक पिढ्यांवर दृश्य संस्कार केले आहेत. चित्रकलेच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या चित्रांचा अभ्यास अनिवार्य असा आहे. अस्सल भारतीयत्व, उत्तम रेखांकन, आशयपूर्वक चित्ररचना, रंगामधून वातावरणनिर्मिती, कथेतील व्यक्तिरेखांचे भावदर्शन, तंत्रशुद्धता अशा अनेक अंगानी त्यांची चित्रे अभ्यासनीय आहेत. दीर्घकालीन गुणवत्तापूर्ण सातत्य राखणाऱ्या ज्येष्ठ बोधचित्रकार प्रभाशंकर कवडी यांचे निधन 1 नोव्हेंबर 1996 रोजी झाले. मात्र त्यांनी निर्माण केलेले चित्रसंचित पुढील पिढ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास वाटतो.

- राहुल देशपांडे
संदर्भ – दृश्यकला चरित्रकोष





# Artist
# Prabhashankar Kawadi

Artist Shri Prabhashankar Kawadi made a remarkable contribution to the illustration art in India. He is known for preserving the essence of authentic Indian culture in his art while effectively communicating visually. His artistic career highlights the consistency, commitment, and exceptional quality of work he produced over several decades.

Born on September 28, 1924, Prabhashankar Kawadi pursued higher education in art after graduating high school. He completed the G.D. Art (Commercial) program in 1947 at Sir J.J. School of Arts, passing with flying colors with first class, and securing second place. During his academic years, he excelled in sketching, memory drawing, composition, and figure drawing. His inclination towards illustration was evident from the beginning. He worked as a fellow at J.J. School of Arts until 1952, and later as a lecturer. After this brief teaching tenure, artist Kawadi joined the renowned advertising agency J. Walter Thompson, where he worked as an illustrator for about eight years. He later moved to the prestigious art department of The Times of India, where his career flourished as a story illustrator. His illustrations supporting fictional narratives in The Illustrated Weekly captivated audiences across India.

Artist Kawadi created impactful visual narratives and compelling atmospheres through his illustrations. He meticulously maintained the authenticity of the characters with expressions, attire, and detailed portrayals of the surroundings. His ability to effortlessly convey the emotions of the characters exemplifies his keen observation skills. He produced a substantial amount of work for various Times publications. While illustrating adopted or translated literary works across various Indian languages, he skillfully incorporated regional characteristics along with the essence and style of the narratives.

Artist Kawadi's artistic style was sketching-oriented. His mastery of line drawing and human anatomy is particularly notable. He effectively used lines, creating depth and expressiveness with black ink and tools like dip pens and crow quills. His illustrations featured varied line thicknesses—fine lines, bold strokes, brush-filled forms, and cross-hatching techniques—blending to create striking compositions. The background elements in his illustrations were carefully chosen for compositional as well as atmospheric purposes.










Artist Kawadi's ability to meaningfully communicate through visual language, with a close representation of the narrative, effectively conveyed the spirit of the literary work, showcasing his profound literary understanding.






Artist Kawadi primarily worked with pen-and-ink and scraperboard techniques; however, he produced illustrations with remarkable stylistic diversity. He balanced tonal variations between black and white, and carefully considered composition while minding the printing methods which would be applied to the work. His illustrative range covered a vast spectrum—mythological and historical themes, children's literature, poetry, articles, textbooks, newspapers, book covers, theater advertisements, Diwali special magazine issues, magazine articles, and several fictional series. His illustrations for Kishor, a long-running popular children's magazine are particularly noteworthy.

Over a career spanning nearly 50 years, artist Kawadi created illustrations for numerous respected publishing houses and establishments, leaving a lasting visual impact on multiple generations. His works remain essential study material for students of fine arts across generations. His illustrations stand out for their authenticity, exceptional drawings, thoughtful compositions, expressive characterization, and technical precision.

Artist Prabhashankar Kawadi, considered one of the beacons of illustrative art in India, passed away on November 1, 1996, leaving a huge legacy behind, which continues to inspire and entertain the generations to follow.

-Varsha Pendse

# Artist in Spotlight

This section is dedicated to highlighting artists from the growing TRPS art community and their creative contributions.

**Dr. Meera Kulkarni**

Passion Knows No Boundaries! Artist Dr. Meera Kulkarni cultivated her love for painting despite a demanding career in the medical profession. Dr. Kulkarni has been painting since early childhood, and at 66, her art continues to flourish.

Dr. Meera Kulkarni recently exhibited her work at The Ravi Paranjape Studio.





Depicting a corner of Pune on a warm afternoon March, this painting tries to capture to two true identies of the city.
The iconic auto rickshaw which is taking its afternoon siesta.

Media: Acrylic on canvas

***"Absorb the beauty and present it beautifully"***

*Ravi Paranjape*

# Visual
# MELODY

### About *VISUAL MELODY* quarterly e-magazine

https://www.raviparanjape.org/visual-melody

*Visual Melody*, is a FREE quarterly e-magazine offered by 'The Ravi Paranjape Studio'. 'Visual Melody' introduces you to brilliant Indian artists from various facets of visual art from the past and present generations.

The inaugural issue of 'Visual Melody,' dedicated to the legendary painter Madhavrao Satavlekar, was launched on October 8th, 2019 under the auspices of Shri. Ravi Paranjape, on his 84th birthday. Since 2020, each issue of *Visual Melody* featured one extraordinary artist each quarter– Shri K.B. Kulkarni, Shri N.S. Bendre, Shri Dinanath Dalal, Shri Gopalrao Deuskar, Shri Ravindra Mestry, Shri S.M. Pandit, Shri Ravi Paranjape, Shri S.D. Phadnis, Shri G.S. Majgaonkar, Shri Shivaji Tupe, Shri Datta Padekar, Shri Maruti Patil, Shri Madan Garge, Shri Charuhas Pandit, Shri Chintamani Hasabnis, Shri Arvind Mestry, Mrs. Padma Sahasrabuddhe and a special edition Abhijatata and the art of Wassily Kandinsky.

All of these issues are available at https://www.raviparanjape.org/visual-melody for your enjoyment.

The creative team behind *Visual Melody* looks forward to continue bringing artistic brilliance to you through this publication.

We would love to hear from you. Please send your feedback at abhijatkala@gmail.com

### 'व्हिजुअल मेलडी' ई-त्रैमासिक

https://www.raviparanjape.org/visual-melody

द रवी परांजपे स्टुडियो तर्फे 'व्हिजुअल मेलडी' हे ई-त्रैमासिक विनामूल्य वितरीत केलं जातं. दृष्य कलेच्या विविध शाखांमधल्या, कालच्या आणि आजच्या पिढीतल्या अग्रणी कलाकारांची ओळख 'व्हिजुअल मेलडी' या अंकातून करून दिली जाते.

ज्येष्ठ चित्रकार श्री. माधवराव सातवळेकर यांना मानवंदना देणारा 'व्हिजुअल मेलडी' चा पहिला अंक ८ ऑक्टोबर २०१९ साली श्री. रवी परांजपे सरांच्या ८४ व्या वाढदिवसाचं औचित्य साधत प्रसिद्ध झाला. त्यानंतर २०२० सालापासून प्रत्येक तिमाहीला एकेका दिग्गज कलाकाराची ओळख करून देणारे 'व्हिजुअल मेलडी' चे अंक प्रसिद्ध केले गेले, गेल्या पाच वर्षांत या गुणी कलाकारांची ओळख करून देणारे अंक प्रसिद्ध झाले – श्री. के. बी. कुलकर्णी, श्री. एन. एस. बेंद्रे, श्री. दिनानाथ दलाल, श्री. गोपाळराव देऊस्कर, श्री. रवींद्र मेस्त्री, श्री. एस. एम. पंडित, श्री. रवी परांजपे, श्री. शि. द. फडणीस, श्री. जी. एस. माजगावकर, श्री. शिवाजी तुपे, श्री. दत्ता पाडेकर, श्री. मारुती पाटील, श्री. मदन गर्गे, श्री. चारुहास पंडित, श्री. चिंतामणी हसबनीस, श्री. अरविंद मेस्त्री, श्री. मरियो मिरांडा, श्री. वॉल्टर लँगहॅमर, सौ. पद्मा सहस्रबुद्धे आणि अभिजातता व वॅसिली कॅन्डीन्स्की यांची कला, विशेषांक.

हे सर्व अंक https://www.raviparanjape.org/visual-melody या ठिकाणी सर्व कालारसिकांसाठी उपलब्ध आहेत.

यापुढेही अशाच दृष्यकलेच्या विविध शाखेतल्या गुणी कलाकारांना आपल्यापर्यंत पोचवण्याचा व्हिजुअल मेलडी च्या कार्यकारी समितीचा प्रयत्न राहील.

आपला अभिप्राय abhijatkala@gmail.com येथे जरूर कळवा.

# TRPS Initiatives

The Ravi Paranjape Studio

'The Ravi Paranjape Studio' is a privately operated group. The group's objective is to promote the 'Design-based culture' envisioned by Artist Ravi Paranjape, through several initiatives run at the studio's privately owned art gallery and space located in Model Colony, Pune.

- Artist Ravi & Smita Paranjape Scholarship for deserving students pursuing art studies
- Art Education - classes and workshops offered to all age groups focused on strengthening the fundamentals.
- FREE quarterly eMagazine, Visual Melody, featuring talented Indian artists from the past and present generations.
- FREE weekly group sketching practice sessions in The Ravi Paranjape Studio's premises, run by the dedicated volunteer artists of The Sunday Sketch Club.
- The Ravi Paranjape Studio's Art Gallery & Exhibition Space is offered to individuals and groups for art exhibitions, art-related events, and workshops to encourage upcoming artists and promote quality art.

Artist Ravi & Smita Paranjape ChitraDiksha Est. 2023 Scholarship

The Sunday Sketch Club — An initiative by The Ravi Paranjape Studio

art gallery exhibition space

ChitraDiksha — Art Education at The Ravi Paranjape Studio




# Studio events and Announcements

**Visit TRPS website, insta or facebook for the updates, upcoming events, announcements and archives**

www.raviparanjape.org
Instagram.com/theraviparanjapestudio
facebook.com/theraviparanjapestudio
Youtube.com/theraviparanjapestudio




# The Sunday Sketch Club

An initiative by **The Ravi Paranjape Studio**

## On Every Sunday 9 am - 11 am

## Open for all

THE RAVI PARANJAPE STUDIO

**The Ravi Paranjpe Studio**

1 Rutika apts., 1098/5A, Model colony, Pune - 41016

Contact: +91 87 66 907 242 / +91 90 96 431 161

THE RAVI PARANJAPE STUDIO

# art & gallery exhibition space

600 sq ft indoor art gallery

1000 sq ft of beautifully designed outdoor exhibition space

Ideal for individual or group art shows, workshops, art demos..

Indoor and outdoor spaces are available separately or together

find your expression!

Inquire:

11 am to 7 pm
+91 9423562530

abhijatkala@gmail.com
raviparanjape.org

The Ravi Paranjape Studio
1 Rutika Apartments
1098/5-A Model Colony
Shivajinagar, Pune 411016

Plan a visit to see the gallery and exhibition space

Call/WhatsApp +91 9423562530
abhijatkala@gmail.com



Compliments from
**The Ravi Paranjape Studio, Pune**

For latest events please visit :
www.facebook.com/theraviparanjapestudio
Email: abhijatkala@gmail.com